<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>
(सकाळ)

जा.क्र. ५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०१/२०१७

**१) संगनमत करुन शासनाचे अहवेलना करुन रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद.. :-**

दि. २१/०१/२०१७ चे १९.०० ते २३.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन निलज खुर्द वैनगंगा नदी पात्रातुन पोकलॅन्ड ने रेती उत्तखनन करुन व शासनाचे आदेशाची अहवेलना करुन ३ ट्रक मध्ये प्रत्येकी ४ ब्रास रेती एकुण १२ ब्रास रेती कि. ३६,०००/—रु. ची चोरी करुन मिळुन आल्याने तसेच नदी पात्रात ८ ट्रक/टिप्पर, २ ट्रॅक्टर/ट्राली हे रेती चोरी करण्याचे प्रयत्न करतांना मिळुन आल्याने घटनास्थळावर एकुण ४९ लाख ३६ हजार/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी विनोद वाकडे पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९,५११,१८८,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. बोरकुटे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**२) रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. —**

दिनांक २२/०१/२०१७ चे ०१.०० वा. दर. यातील रेती भरलेला ट्रक चा मोजमाप करुन पो. स्टे. समोरील रोडचे बाजुस उभा करुन ठेवलेला ट्रक आरोपी ट्रक चालक/मालक यांनी २५,५९० किलो ग्रॅम रेती भरलेला ट्रक सह कि. ८ लाख ९ हजार /—रु. चा माल चोरुन घेवुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. बोरकुटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी. :-**

**अ)** दिनांक २०/०१/२०१७ चे १६.०० ते १७.०० वा. दर. यातील फिर्यादी वामण विजय नासरे वय २१ वर्ष, रा. राजगोपालचारी वार्ड सिव्हील लाईन भंडारा यांनी आपल्या घरासमोरील एव्हेंजर गर्द निळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही ७९४० कि. ६०,०००/—रु. ची ठेऊन घरामध्ये गेला व थोडया वेळा नंतर घराबाहेर आला असता मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २१/०१/२०१७ चे २०.३० ते २२.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश मनोहरराव कुर्वे वय ४१ वर्ष, रा. न्यु शिवाजी नगर खात रोड रोड खोकरला यांनी आपली स्पलेंडर प्लस काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ७९२४ कि. १५,०००/—रु. ची मारोती सुजुकी शोरुम समोर मंगलम लॉन येथे ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :-**

दिनांक २१/०१/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादी आनंद राजेन्द्र धुत वय ४५ वर्ष, रा. तकीया वार्ड भंडारा याचा चुलत भाऊ मृतक कपील जगदीश धुत वय २५ वर्ष, रा. राम मंदीर वार्ड भंडारा हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ९९९० ने कारधा येथुन भंडारा येथे येत असतांना यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व भरधाव वेगाने चालवुन मृतकचे मोटार सायकलला एन एच ६ रोडवर वैनगंगा नदीचे पुलाजवळ धडक मारुन मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २२/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, कारधा, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, साकोली, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६१ लिटर हातभट्टी दारु कि. ४,२४०/—रु. व ०४ लिटर ५० मिलीलीटर देशी दारू कि. ५,३७५ /—रू तसेच जुगारातुन कि. १,२७० /—रू असा एकुण ६,६४५/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.